स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मुख्य कार्यालय, विरार
विरार (प.),
ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./ / /25-26
दिनांक :

**प्रेसनोट**

**अवयवदान जागरूकता मोहीम दि.०३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२५**

**(अंगदान जीवन संजीवनी अभियान)**

"अंगदान जीवन संजीवनी अभियान" या अभियानांतर्गत देहदान / अवयवदान केलेल्या नातेवाईकांना सन्मानित करणेकरिता दिनांक १४/०८/२०२५ रोजी वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, चौथा मजला, महासभा हॉल येथे सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

सदर कार्यक्रमास मा. श्री. राजन नाईक, आमदार, नालासोपारा विधानसभा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच "The Federation of Organ and Body Donation" या संस्थेचे संस्थापक श्री. पुरुषोत्तम पवार आणि सदस्य, महानगरपालिकेचे मा. अतिरिक्त आयुक्त श्री दिपक सावंत, मा. उपायुक्त (वैद्यकीय) श्री. प्रशांत जाधव, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. भक्ती चौधरी, उपवैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनिरूध्द भेले, आर.सी.एच अधिकारी डॉ. स्मिता वाघामारे, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. राजेश चौहान व कर्मचारी उपस्थित होते.

श्री. विश्वनाथ तळेकर, सहा. आयुक्त यांनी सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. भक्ती चौधरी यांनी सदर कार्यक्रमात अवयवदानाबाबतचे महत्व व कोणकोणते अवयव दान करता येते याबाबत विस्तृत माहिती सांगितली.

श्री. पुरुषोत्त्म पवार यांनी अवयवदानाच्या कामाचे स्वरूप, कामात येणारे अडचणी तसेच काम करताना येणारे अनुभव याची माहिती दिली.

महानगरपालिकेचे मा. अतिरिक्त आयुक्त, श्री.दिपक सावंत यांनी महानगरपालिकेमार्फत घेण्यात येणाऱ्या जनजागृती कार्यक्रमाबाबत माहिती दिली. यामध्ये नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जनजागृती करणे, शाळा आणि महाविद्यालयामध्ये चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे, विजेत्या विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करणे, अवयवदान जनजागृती करिता रॅली काढणे इ. बाबींचा समावेश होत असल्याबाबत माहिती देण्यात आली.

मा. आमदार श्री राजन नाईक साहेब, नालासोपारा विधानसभा यांनी अवयवदान केलेल्या दात्यांच्या कुटुंबीयांचे आभार मानून शहरातील नागरीकांना अवयवदान करणेस पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत अवयवदान केलेल्या एकूण ३३ दात्यांच्या नातेवाईकांचा सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.मा. उपायुक्त (वैद्यकीय) श्री. प्रशांत जाधव, यांनी मान्यवर आणि अवयवदान केलेल्या दात्यांच्या नातेवाईकांचे आभार मानले.

वैद्यकीय आरोग्य विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका